

प्रेरणास्थान
श्री. सुरेशदादा जैन

SEED

Suresh Dada Scheme for
Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना



मातोश्री श्रीमती प्रेमाबाई भिकमचंदजी जैन
उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना

# ज्ञानयज्ञ

***आमचे ध्येय:***
*गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक व उद्योजकीय कौशल्ये विकसित करून त्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनविणे.*

## आधुनिक तंत्रज्ञान...
## उज्ज्वल भविष्याचे वरदान



वर्ष ६ | अंक १६ | जानेवारी–एप्रिल २०१७



# “लक्ष्मी–सरस्वतीच्या समन्वयाची भूमिका”



प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

समाजाचा सर्वांगीण विकास हा शैक्षणिक, सामाजिक, राजकीय तसेच आर्थिकदृष्ट्या अशा टप्प्याटप्प्याने होत असतो. विशेषत: भारतीय समाज हा विविधतेने नटलेला आणि विविध परंपरांच्या अंकीत राहून विकासाची स्वप्न पाहणारा आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शैक्षणिक विकासासाठी शासकीय योजना जशा महत्त्वाच्या ठरतात तशाच स्वयंसेवी संघटना आणि सामाजिक भान जपणाऱ्या औद्योगिक गटांकडूनही सहकार्याचे अनेक मार्ग खुले असतात. एखाद्या गरीब, होतकरू आणि हुशार विद्यार्थ्याला केवळ आर्थिक अडचणींमुळे शिक्षणापासून वंचित राहावे लागणे ही बाब खूप क्लेशदायक वाटते. म्हणून परिसरातील अशा गुणवंतांना प्रोत्साहन द्यावे, त्यांना आर्थिक मदतीसह उच्चशिक्षणाची कवाडे खुली व्हावी या सामाजिक बांधिलकीतून 'सुरेशदादा स्कीम फॉर एज्युकेशनल अ‍ॅन्ड इन्ट्रीप्रुन्येरीयल डेव्हलेपमेंट' म्हणजेच 'एसडी–सीड' या शैक्षणिक योजनेची सुरूवात सुमारे नऊ वर्षापूर्वी झाली. आता दशकपूर्तीची ही वाटचाल स्पृहणीय आणि उत्साहवर्धक ठरते आहे. अनेक विद्यार्थी या योजनेतून शिक्षण घेवून जीवनाच्या विविध क्षेत्रात 'भरारी' घेत आहेत हे पाहून अंत:करणात एक कृतार्थभाव उत्पन्न होतो. जळगावचे लोकनेता मा. दादासाहेब सुरेशजी जैन यांनी आपल्या मातोश्री स्व. प्रेमाबाई भिकमचंदजी जैन यांच्या स्मरणार्थ ही शिष्यवृत्ती योजना मोठ्या दूरदृष्टीने आणि सामाजिक भान ठेवून सुरू केली आहे. त्याची गोड फळे समाजात दृष्टीपथात येत आहेत.

या योजनेंतर्गत व्यक्तिमत्व विकास, मुलाखत तंत्र, संभाषण कला, व्यावहारिक जीवनातील कौशल्य विकास, परीक्षापद्धती आणि तिची तयारी इत्यादी संदर्भातील वर्षभरातील विविध कार्यक्रम–कार्यशाळांचे आयोजन महत्त्वाचे ठरते. विविध अनुभवी वक्त्यांचीही माहितीपूर्ण भाषणे आणि मार्गदर्शनाची सोय परिसरातील तरूणपिढीला धाडसाने उभी करत आहे. तरूणपिढी हीच देशाची खरी आधारस्तंभ असते. तिला योग्य मार्ग दाखवला नाही तर बहि:स्थ प्रलोभने आणि व्यसनाधीन आळशीपणाला ती बळी पडू शकते. म्हणून शैक्षणिक वातावरणातील औपचारिक शिक्षणासोबत त्यांना अनौपचारिक शिक्षणाचे बीजारोपण करण्यास 'एसडी–सीड'ची बांधिलकी महत्त्वाची ठरते. व्यक्तिमत्वाची जडणघडण केवळ पुस्तकी ज्ञानाने होत नाही तर नैतिकमूल्ये आणि संस्कारक्षम प्रायोगिक व्यावसायिक व्यवहारज्ञान तितकेच महत्त्वाचे असते. पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण हे नेहमीच्या शैक्षणिक पद्धतीत बंदीस्त असले तरी त्याच्या मूलभूत भूमिकेतून करिअरच्या संधीकडे पाहण्याची दृष्टी तरूणांना आवश्यक असते. त्यासाठी मागच्या तिमाहीच्या काळात जे विविध उपक्रम झालेत ते खूप लक्षणीय ठरतात.

असं म्हणतात की, जग हे अर्थशास्त्राच्या चक्रानुसार आणि विकासाच्या गतीनुसार चालते. परंतु या चक्राला चालवण्यासाठी जशी कायनेटिक एनर्जी लागते, वीज लागते तसाच मानवीशक्तीचा (मानव संसाधन) महत्त्वपूर्ण सहभाग असावा लागतो म्हणून 'एसडी–सीड' या योजनेतून शिष्यवृत्तीची केवळ आर्थिक ऊर्जाच नव्हे तर त्यासोबत मानवी विकासाची प्रचंड ऊर्जा नव्या पिढीच्यारूपाने शिक्षित होत आहे. ही दूरदृष्टी आणि मानवी भावनांची 'जगा आणि जगू द्या' ही भूमिका महत्त्वाची वाटते. यासंदर्भात नव्या पिढीतील जे काही नवे तारे या योजनेतून चमकले त्यांच्या बोलक्या, हार्दिक आणि यशोमय प्रतिक्रिया खूप चपखल वाटतात. त्यांच्या जीवनात या आर्थिक तसेच शैक्षणिक उपक्रमामुळे जी ऊर्जा आली, त्यांना दिशा मिळाली ती त्यांनी प्रांजळपणे मांडली. हे अनुभवांचे साररूपाने आलेले सद्‌भावाचे फळ आहे. कु. नीलम बाफना, अनिकेत आवारे, तेजस नाईक, विनय भोळे आणि मयुर पाटील इत्यादींनी व्यक्त केलेल्या निखळ भावना त्यांच्या संस्कारशीलवृत्तीचे आणि कृतज्ञतेचे प्रतीक ठरतात. त्याचा अन्वयार्थ समाजबांधवांनी घ्यावा असे वाटते.

'आजचा काळ' आर्थिकदृष्ट्या खूप कठीण आहे. तसा तो 'काल'ही होता आणि 'उद्या'ही असू शकतो. तरूणांनी तपस्विता, तेजस्विता आणि तत्परता या माध्यमातून तडफदार जगलं पाहिजे. संकटांना घाबरून न जाता काळाशी धीराने दोन हात केले पाहिजेत. संयम, दूरदृष्टी, नम्रता आणि कठोर परिश्रमांसाठी तत्पर असलं पाहिजे. आपली गरिबी कधीच आपल्याला नामोहरण करीत नाही, उलट ती उद्याच्या उभारीसाठी, कष्टांसाठी बळ देते. म्हणून अशावेळी आपली शूरता, वीरता ही नकारात्मकतेतून सकारात्मक ऊर्जेत परावर्तीत केली पाहिजे. सूर्य–नदी यांचे सातत्य बघा. दोन्ही कधीच थांबत नाहीत. “थांबला न सूर्य कधी! थांबली न धारा! आणि धुंद वादळास कोठला किनारा!!” (बाबा आमटे). चला मग संकटांवर मात करण्यास सज्ज होवूया. 'एसडी–सीड' मदतीला, पाठीवर थाप द्यायला आहेच.

समाजाचा सर्वांगीण विकास हा 'लक्ष्मी आणि सरस्वती' यांच्या समन्वयाने होवू शकतो याचे भान ठेवून आपल्या दातृत्वाला अधिक व्यापक, विशाल करण्याची ही 'एसडी–सीड' योजना दहा वर्षांपूर्वी घोषित झाली. तिचं एक इवलसं रोपटं लावलं गेलं. त्याचा वृक्ष वाढत वाढत तो महावृक्ष होत जाईल अशी आशा वाटते. या योजनेत सर्वांनीच सहभाग नोंदवावा आणि आपणही या समाजाचं–राष्ट्राचं देणं लागतो हा समभाव जपावा, ही अपेक्षा करतो.

**– प्राचार्य डॉ. किसन पाटील**
**एसडी–सीड सल्लागार समिती सदस्य**

## या अंकात...


| या अंकात... | पृष्ठ क्र. |
|---|---|
| १. संपादकीय | २ |
| २. एसडी–सीड गुणवंतांची यशोगाथा | ३ |
| ३. विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम | ४ व ५ |
| ४. डिजिटल इंडिया आणि विद्यार्थी | ६ |
| ५. प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे | ७ |
| ६. लाभार्थ्यांचे मनोगत | ८ |



## ज्ञानयज्ञ संपादक मंडळ

श्री. राजेश यावलकर – ज्ञानयज्ञ प्रमुख संपादक, श्री. एन.जे. गादिया, श्री. महेश गोरडे, श्री. नीळकंठराव गायकवाड, श्री. मिलींद कुलकर्णी, प्रा. एस.व्ही. सोमवंशी

# एसडी–सीड गुणवंतांची यशोगाथा

'कष्टाला पर्याय नाही' हे अत्यंत खरे आहे. अत्यंत हलाखीच्या, कष्टाच्या परिस्थितीतही मनोबलाच्या सामर्थ्यावर व्यक्ती किती विस्मयकारी यश मिळवू शकतो हे एसडी–सीडच्या लाभार्थ्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात केलेल्या प्रगतीवरून दिसून येते. ज्या विद्यार्थ्यांना बिकट परिस्थितीमध्ये शिक्षण घेण्यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते; त्यांना एसडी–सीड शिष्यवृत्तीचा मायेचा आधार लाभला आणि आज ते त्यांचे शिक्षण अविरतपणे घेत आहेत. त्यातील काही विद्यार्थी विविध क्षेत्रात दैदिप्यमान यश मिळवत आहेत. यातील अशा काही लाभार्थ्यांची यशोगाथा तुमच्या समोर मांडत आहोत. या गुणवंत, मेहनती, जिद्दी लाभार्थ्यांचे हे यश म्हणजे एसडी–सीडच्या शिरपेचात एक मानाचा तुरा आहे.

## १. नीलम भरत बाफना – पाचोरा



★ 'उपजिल्हाधिकारी गट–अ' पदी निवड २०१७

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन करून नीलम भरत बाफना ही एसडी–सीडची लाभार्थी खुल्या प्रवर्गातून मुलींमध्ये राज्यात पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण होवून तिची 'उपजिल्हाधिकारी गट–अ' पदी निवड झाली आहे. त्या निमित्ताने तिचा नुकताच एसडी–सीडचे प्रेरणास्थान मा. सुरेशदादा जैन यांच्या हस्ते छोटेखानी सत्कार करण्यात आला.

नीलमची घरची परिस्थिती साधारण आहे. तिच्या वडीलांचे पाचोरा येथे लहानसे किराणा दुकान आहे. आई गृहिणी आहे. गुणवत्ता असूनही योजिलेले शिक्षण घेण्यासाठी असंख्य अडचणींचा सामना करावा लागत असतांनाच एसडी–सीडची शिष्यवृत्ती तिच्या मदतीसाठी धावून आली आणि तिच्या संघर्षमय जीवनाचे एक नवे आनंददायी पर्व सूरू झाले. प्रखर जिद्द, आत्मविश्वास उराशी बाळगून एसडी–सीडच्या मदतीने इंजिनीअरिंगचे शिक्षण पूर्ण केले. पण येथेही न थांबता तिने स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली आणि त्यात तिला उल्लेखनीय यश मिळाले. ती सांगते, मा. सुरेशदादांसारख्या दानशूर प्रवृत्ती असलेल्या व्यक्तींच्या आशीर्वादामुळेच तिच्यासारख्या होतकरू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांनाही शिक्षण पूर्ण करून आयुष्यात काही तरी मोठं करण्यासाठी धाडस, पाठींबा आणि प्रेरणा मिळत आहे.

## २. अनिकेत आवारे, अंकित शिरसाठ, विनय मुळे – जळगाव




★ प्रोजेक्ट–कृषकसाठी झी २४ तासचा 'यंग इनोव्हेटर पुरस्कार–२०१६' चा विजेता 'डिपेक्स–२०१७' राज्यस्तरीय प्रदर्शन तथा स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक

नवीन काहीतरी करण्याची महत्वाकांक्षा आणि त्याला नवविचारांची जोड देवून या तीन विद्यार्थ्यांनी त्यांच्या 'बहुउपयोगी कृषी यंत्र – कृषक'च्या माध्यमातून नवीन कल्पना सर्वांसमोर मांडली. त्यांच्या या उत्कृष्ट कामगिरीबदद्ल महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल मा. श्री. विद्यासागरराव, मुख्यमंत्री मा. श्री. देवेन्द्र फडणवीस आणि शिक्षणमंत्री मा. श्री. विनोद तावडे यांच्या हस्ते त्यांना गौरवान्वित करण्यात आले.

तिघांची घरची परिस्थिती बिकट असल्यामुळे प्रोजेक्टसाठी लागणारा खर्च कसा भागवायचा हा प्रश्न त्यांना भेडसावत असतानाच यावर्षी त्यांना मिळालेल्या शिष्यवृत्तीच्या मदतीने त्यांनी त्यांचा प्रोजेक्ट करायला सुरूवात केली आणि नवीन तंत्रज्ञानाच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

साधारण कुटुंबातील ह्या मुलांना योग्य मदत आणि मार्गदर्शन मिळाले की त्यांच्या विचारांच सामर्थ्य वाढते. त्यांनी तयार केलेले यंत्र शेतक–यांसाठी अत्यंत बहुउपयोगी असे उपकरण आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रात नक्कीच एक यांत्रिक चळवळ होवून शेतक–यांचे श्रम आणि वेळ दोन्ही वाचवू शकतात.

## ३. तेजस नीतीन नाईक – जळगाव



★ दर्यासागर सामाजिक संस्था, जळगावतर्फे 'राष्ट्रीय कलाश्री पुरस्कार'

★ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आयोजित 'युवारंग–२०१७' महोत्सवात शास्त्रीय गायन स्पर्धेत 'सुवर्ण पदक' आणि शास्त्रीय सुरवाद्य सूरवाद्य स्पर्धेत 'रजत पदक'

तेजस नाईकला जळगाव जिल्ह्याचा एक 'उगवता तारा' असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. नउ वर्षाचा असतांना एका आजारात त्याला दोन्ही डोळे गमवावे लागले. ते वय असं होतं की काही कळतं नव्हतं; पण इतकं मोठंही नव्हतं की दृष्टी जाण्याचा आघातही सहन करू शकत होते. आपल्यासाठी एक दार बंद झाले की नवीन हजारो कवाडे निसर्ग आपल्यासाठी खुली करीत असतो याची प्रचिती तेजसला एसडी–सीडकडून मिळालेल्या शिष्यवृत्तीच्या मदतीमधून दिसून येते.

एक दिव्यांग विद्यार्थी दृष्टी गेल्याचा आघात सोसून त्याच्या अपार मेहनत, जिद्दीच्या बळावर संगीत क्षेत्रात यश मिळविण्यासाठी जी धडपड दाखविती ती खरच अनेक डोळस विद्यार्थ्यांना एक प्रेरणा देवून जात आहे.

मागील चार महिन्यात एसडी–सीडने विद्यार्थ्यांमधील कौशल्य व सुप्त गुण विकसित व्हावे यासाठी १५ कार्यक्रम राबविले. एकूण १९८५ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

### 'विविध कौशल्य विकास' – दोन कार्यक्रम



मार्गदर्शक: प्रा. सुरेश पांडे – एसडी–सीड, सल्लागार समिति सदस्य
ठिकाण: १. आर. आर. माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जळगाव
२. अरूणामाई कॉलेज ऑफ फार्मसी, ममुराबाद, जळगाव
उपस्थिती: सुमारे ३०० विद्यार्थीनींनी याचा लाभ घेतला.
कार्यक्रमाचे उद्दिष्ट: विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास व्हावा तसेच प्रभावी संभाषण कौशल्य, प्रभावी सादरीकरण कौशल्य विकसित करण्यासाठी आणि प्रभावी मुलाखत कौशल्य आत्मसात करून त्यांचे करिअर उज्ज्वल व्हावे.

### 'करिअर मार्गदर्शन' – दोन कार्यक्रम



मार्गदर्शक: प्रविण सोनवणे एसडी–सीड असोसिएट
ठिकाण: १. मानवसेवा माध्यमिक विद्यालय, जळगाव
२. चांदसरकर माध्यमिक विद्यालय, जळगाव
उपस्थिती: सुमारे २५५ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.
कार्यक्रमाचे उद्दिष्ट: विद्यार्थ्यांना योग्य करिअर निवडता यावे, त्यांच्यातील बलस्थाने, कमतरता, कौशल्य आणि त्यांची आवड लक्षात घेवून कोणत्या विषयात करिअर करता येईल या बाबत मार्गदर्शन करणे.

### परीक्षेला सामोरे जातांना



मार्गदर्शक: डॉ. नरसिंग परदेशी
ठिकाण: माता रमाबाई आंबेडकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जळगाव
उपस्थिती: सुमारे १६० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.
कार्यक्रमाचे उद्दिष्ट: विद्यार्थ्यांचे परिक्षा काळातील मानसिक दडपण कमी व्हावे व त्यांना हसत खेळत ताणविरहित परिक्षा देता यावी.

### ताण व्यवस्थापन



मार्गदर्शक: श्री. नंदलाल गादिया – एसडी–सीड गव्हर्निंग बोर्ड सदस्य
ठिकाण: या. दे. पाटील माध्यमिक विद्यालय, मेहरूण, जळगाव
उपस्थिती: सुमारे १६० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.
कार्यक्रमाचे उद्दिष्ट: विद्यार्थ्यांच्या प्रकृतीवर तणावाचा परिणाम होवू नये तसेच विद्यार्थ्यांना परिक्षा काळातील मानसिक दडपण कमी व्हावे आणि त्यांना हसत खेळत परिक्षा देता यावी.

### सीईटी परीक्षा पूर्वतयारी



मार्गदर्शक: प्रा. एस. व्ही. सोमवंशी, एसडी–सीड, सल्लागार समिती सदस्य
ठिकाण: धनाजी नाना चौधरी कनिष्ठ महाविद्यालय, जळगाव
उपस्थिती: सुमारे १८० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.
कार्यक्रमाचे उद्दिष्ट: विद्यार्थ्यांना वेगवेगळया सीईटी परिक्षा कोणत्या आणि त्यांना सामोरे जाण्यासाठी त्यांची पुर्वतयारी कशी करावी यासंदर्भात माहिती व्हावी.

### अभ्यासाचे महत्व – दोन कार्यक्रम



मार्गदर्शक: प्रविण सोनवणे – एसडी–सीड सहकारी
ठिकाण: १. राज माध्यमिक विद्यालय, जळगाव
२. माध्यमिक विद्यालय, बांभोरी, जळगाव
उपस्थिती: सुमारे २६० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.
कार्यक्रमाचे उद्दिष्ट: विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची आवड निर्माण व्हावी, त्यांनी हसत खेळत अभ्यास करावा, त्यांना अभ्यासाचा कंटाळा येवू नये आणि यशस्वी परिक्षा देता यावी.

### वेळेचे व्यवस्थापन



**मार्गदर्शक:** प्रा. सुरेश पांड, एसडी–सीड, सल्लागार समिती सदस्य

**ठिकाण:** समाजकार्य महाविद्यालय, जळगाव **उपस्थिती:** सुमारे १९० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

**कार्यक्रमाचे उद्दिष्ट:** विद्यार्थ्यांना त्यांच्या शालेय जीवनात वेळेचे महत्व कळावे व मिळालेल्या वेळेचा योग्य सदुपयोग करून वेळेसंदर्भात असलेल्या दैनंदिन तक्रारी जाणून घेवून त्यावर कशी मात करता येईल यासंदर्भात विद्यार्थ्यांना मागदर्शन मिळावे.

---

### मुलाखत तंत्र – दोन कार्यक्रम



**मार्गदर्शक:** प्रा. सुरेश पांडे, एसडी–सीड, सल्लागार समिती सदस्य

**ठिकाण:** १. आयएमआर कॉलेज, जळगाव २. नॉर्थ महा. नॉलेज सिटी, कॉलेज ऑफ इंजि. ॲन्ड टेक्नोलॉजी

**उपस्थिती:** सुमारे ३१० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

**कार्यक्रमाचे उद्दिष्ट:** विद्यार्थ्यांजवळ भरपूर प्रमाणात ज्ञान असूनही प्रभावी मुलाखत तंत्राच्या अभावामुळे विद्यार्थ्यांना पाहिजे त्या प्रमाणात जीवनात यश मिळत नाही. यशस्वी होण्यासाठी त्यांच्या मुलाखत कौशल्याचा विकास व्हावा, त्यांना यशस्वी मुलाखत कशी देता येईल या संदर्भात प्रात्यक्षिकातून, निरीक्षणातून शिकायला मिळावे या उद्देशाने आयोजन करण्यात आले.

---

### 'मनाची एकाग्रता'



**मार्गदर्शक:** श्री. प्रविण सोनवणे, एसडी–सीड असोसिएट

**ठिकाण:** पी. एम. मुंदडे माध्यमिक विद्यालय, पिंप्राळा, जळगाव

**उपस्थिती:** सुमारे १४० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला

**कार्यक्रमाचे उद्दिष्ट:** विद्यार्थ्यांना एकाग्रतेचे महत्व कळावे, एकाग्रता कशी विकसित करावी, एकाग्रता टिकविण्यासाठी काय काळजी घ्यावी आणि त्याचा उपयोग त्याने त्याच्या शालेय जीवनात कसा करावा.

## एसडी–सीडसमोरील आव्हाने

विद्यार्थ्यांच्या ड्रॉप–आउटचे प्रमाण लक्षात घेता यामागची कारणे जाणून घेण्यासाठी एसडी–सीडच्या गव्हर्निंग बोर्ड सदस्य, तालुका समन्वयक व सहकारी या सर्वांनी अशा विद्यार्थ्यांशी व पालकांशी थेट संपर्क साधला असता यासंबंधी बरीच कारणे समोर आली. त्यानुसार पुढे प्रत्येक कारणांवर उपाययोजना आखण्यात आली. परंतु यापैकी प्रामुख्याने दोन कारणांवर आम्हाला लक्ष देणे अत्यंत गरजेचे ठरले ती कारणे म्हणजे मुलांनी शिक्षण पूर्ण करण्यासाठी पालकवर्गात शिक्षणाप्रती जागरूकता नसणे आणि पालक–शिक्षक–विद्यार्थी यांच्यातील परस्पर संबंधाचा अभाव. यावर उपाययोजना म्हणून पालकांमध्ये व विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाप्रती जागरूकता निर्माण होण्यासाठी तालुका स्तरावर मार्गदर्शन सत्रांमध्ये त्यांचे प्रबोधन करण्यात आले व कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. त्याचबरोबर वरील तिन्ही घटकांमधील परस्पर संबंध वाढविण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यात पालकांच्या प्रबोधनाला त्यांचा प्रतिसाद थोड्या कमी प्रमाणात मिळत आहे, परंतु जो काही पालकवर्ग यामध्ये सहभागी होत आहे त्यांच्याकडून आम्हाला या समस्येवर मात करण्यासाठी अतिशय सकारात्मकता दिसून येत आहे. आम्ही सतत याप्रकारच्या कार्यशाळांचे आयोजन करणार असून आम्हांला आशा आहे की यामुळे पालकांमध्ये निश्चितच शिक्षणाप्रती जागरूकता निर्माण होईल व विद्यार्थ्यांमध्ये असलेले ड्रॉप–आउटचे प्रमाण कमी होईल. मागील महिन्यात आम्ही पालकांचे प्रबोधन व शिक्षकांना प्रशिक्षण या दोन्ही विषयांवर प्रत्येकी एक–एक कार्यक्रम राबविले. त्याचा तपशील खाली देत आहोत.

---

### पालकांचे प्रबोधन



**मार्गदर्शक:** श्री. महेश गोरडे – एसडी–सीड गव्हर्निंग बोर्ड सदस्य

**ठिकाण:** या. दे. पाटील माध्यमिक विद्यालय, जळगाव **उपस्थिती:** सुमारे १० पालकांनी लाभ घेतला.

**प्रशिक्षणाची उद्दिष्ट:**

- पालकांना शिक्षणाचे महत्व पटवून देणे
- मुलांच्या प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी त्यांच्याशी संवाद साधणे.
- मुलांना शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रेरित करणे.
- पालकांना सक्रिय भूमिका घेण्यासाठी प्रोत्साहित करणे.

---

### शिक्षकांना प्रशिक्षण



**मार्गदर्शक:** श्री. महेश गोरडे, श्री. नंदलाल गादिया व प्रा. सुरेश पांडे

**ठिकाण:** मानवसेवा मंडळ माध्यमिक विद्यालय, जळगाव **उपस्थिती:** सुमारे २० शिक्षकांनी लाभ घेतला.

**प्रशिक्षणाची उद्दिष्ट:**

- शिक्षकांमध्ये आत्मविश्वास निर्माण होणे.
- विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेणे.
- शिक्षकांमध्ये शिकविण्यासाठी अनुकूल वृत्ती निर्माण होणे.
- विषयानुसार प्रभावी शिक्षणपद्धतीचा वापर करणे.

स्वतःचा अवगुण शोधणं हीच गुणांची पूर्तता.

# डिजिटल इंडिया आणि विद्यार्थी

**माहिती तंत्रज्ञानाचा आजवरचा प्रवास पाहता भविष्यात मानव संपूर्णपणे या विकसित तंत्रज्ञानावर अवलंबून असेल असे चित्र दिसते. मानवी जीवनातील अधिकतम क्रिया–प्रक्रियाची माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पार पाडल्या जातील. जन्म दाखल्यापासून ते मृत्यू दाखल्यापर्यंतच्या संपूर्ण प्रवासातील सर्वच कामे या तंत्रज्ञानामार्फत केली जातील. भविष्यात मानवी जीवन सर्वार्थाने समृद्ध करण्यामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा मोलाचा वाटा असेल यात शंकाच नाही.**

Digital India
Power To Empower

## काय आहे डिजिटल इंडिया?

डिजिटल इंडिया अभियानाबद्दल एका वाक्यात सांगायचे झाल्यास विविध शासकीय विभागांना डिजिटल पद्धतीने एकाच व्यासपीठावर आणणे आणि त्यांना भारतीय नागरिकांशी थेटपणे जोडणे, जेणेकरून त्यांचे प्रश्न आधिक सोयीस्कर पद्धतीने मार्गी लागतील. नागरिकांचा वेळ व पेपरवर्क वाचविण्याच्या दृष्टीने इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सर्व शासकीय सेवा त्यांना उपलब्ध करून देणे हा या प्रकल्पाचा गाभा आहे.

- ★ या अभियानामार्फत सरकारचा देशाला एक माहिती तंत्रज्ञानावर आधारित सशक्त अर्थसत्ता बनवण्याचा प्रयास आहे.
- ★ यामध्ये डिजिटल लॉकर, ईएज्युकेशन, ई–हेल्थ, ई–साईन आणि नॅशनल स्कालरशिप पोर्टल यासारंख्या अनेक योजना आहेत.
- ★ विविध राज्यांमध्ये भारतनेट आणि नेक्स्ट् जनरेशन नेटवर्क योजना राबविणार आहेत.
- ★ माहिती तंत्रज्ञान व संवाद खाते यासाठी महत्वाची भूमिका बजावणार.

## डिजिटल इंडियाची उदिद्ष्टये....

- ★ प्रत्येक नागरिकासाठी डिजिटल सोयी सुविधा पुरविणे.
- ★ मागणीप्रमाणे प्रशासन आणि सुविधांचा पुरवठा करणे.
- ★ नागरिकांचे डिजिटल सबलीकरण करणे.
- ★ ई–गव्हर्नन्सच्या माध्यमातून प्रशासनाचा चेहरामोहरा बदलणे.
- ★ इलेक्ट्रॉनिकच्या वस्तूंच्या उत्पादनात देशाला संपूर्ण स्वावलंबी बनवणे.
- ★ विविध सेवांचा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पुरवठा करणे.
- ★ प्रत्येकासाठी मोबाईल सुविधेची उपलब्धता.
- ★ ब्रॉडबॅंड हायवेजूची निर्मिती करणे.
- ★ सार्वजनिक इंटरनेट सुविधेचा विकास.

## डिजिटल लॉकर योजना आणि फायदे....




प्रत्येक भारतीय नागरिकाला वेगवेगळया कारणांसाठी आवश्यक असणारी विविध शैक्षणिक, शासकीय व अन्य कागदपत्रे ठेवण्यासाठी डिजिटल लॉकरची क्लाउड बेस्ड सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. येथे कागदपत्रे स्कॅन करून एकदा ठेवली की, जगाच्या पाठीवरून कोठेही त्यांच्या प्रती मिळविता येतात.

## फायदे:

या योजनेअंतर्गत नागरिकांना त्यांची पॅनकार्ड, पासपोर्ट, गुणपत्रिका, प्रमाणपत्रे आदी डिजिटल कागदपत्रे सुरक्षितरीत्या साठवण्यास मदत होईल.

त्यामुळे कागदाचा वापर कमी होवून महत्वाचे दस्ताऐवज डिजिटल स्वरूपात उपलब्ध होतील आणि त्यांना विविध सरकारी सुविधांचा सामायिक वापन करण्याची सोय होईल.

नागरिकांचा वेळ, जागा आणि कष्टांची बचत होईल.

## डिजिटल इंडिया माध्यमातून तरूणांचे सक्षमीकरण –



ग्रामीण तरूणांना या व्यासपीठावरून विविध क्षेत्रांतील मान्यवर, तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळणार असल्याने त्यांचा व्यक्तीमत्व विकास साधला जाईल. शासन आणि शासनाचे विविध विभाग यांच्या कार्यपद्धतीची तरूणांना जवळून माहिती होईल. या यंत्रणेची बलस्थाने आणि कमकुवत बाजू त्यांच्या लक्षात येतील. आणि त्या बाजू सक्षम करण्यासाठी ते प्रयत्न करतील. डिजिटल इंडियाच्या युझर फ्रेंडलीनेस मुळे जास्तीत जास्त युवक या तंत्रज्ञानाकडे वळतील आणि हे व्यासपीठ देशासाठी एक विचारपीठ म्हणूनही कार्य करू शकेल. ग्रामीण भागातील शेतीवर अवलंबून असणारा तरूण या व्यासपीठावरून शासनाच्या कृषीविषयक धोरणांची माहिती घेईल, त्याच्याही अपेक्षा व्यक्त करील. ही माहिती वा ज्ञान देशातल्या अन्य नागरिकांपर्यंतही पोहोचेल. अशा प्रकारे दोन्ही बाजूंचा फायदा होईल. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात युवकांना अधिक रोजगार संधी उपलब्ध होतील. शासकीय विभागांशी थेट कनेक्टीव्हिटीचा युवकांना निश्चितपणे मोठा लाभ होईल. यामुळे शासन यंत्रणेतील

(पुढील पानावर)

## तंत्रज्ञान मार्गदर्शन (मागील पानावरून)

मध्यस्थांची फळी नाहीशी होवून नागरिक व संबंधित अधिकारी यांच्यात थेट संवाद घडून येईल, ज्यायोगे गतिमान पद्धतीने त्यांचे प्रश्न वेळेत मार्गी लागतील. देशाच्या निर्णय प्रक्रियेमध्ये स्थान मिळाल्याच्या भावनेतून त्यांच्या आत्मविश्वासाची पातळी उंचावेल, ज्याची अन्य कोणत्याही गोष्टीशी तुलनाच होवू शकत नाही. विविध स्टार्टअप उपक्रमांत युवकांना सक्रिय योगदान देण्याची, त्यांच्यातील सुप्त उद्योजकीय कौशल्ये वापरण्याची, विकसित करण्याची संधी मिळेल. संशोधन व प्रशिक्षणाधारित प्रकल्पांच्या माध्यमातून तरूणांना अधिक उत्तम शिक्षणाची संधी मिळेल आणि साहजिकच डिजिटल इंडियाच्या व्यासपीठावर नवकल्पना, नवनिर्माणाच्या संकल्पनांची देवाणघेवाण करणारा उत्तम असा बुद्धिवादी वर्ग निर्माण होईल. ऑनलाइन शिक्षणामुळे ग्रामीण युवकांना शिक्षणाचा अधिक चांगला अनुभव मिळेल. शहरी व ग्रामीण शिक्षणामधील दरी कमी होण्यास त्यामुळे मदत होईल. अखेरची पण सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे युवकांना या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर ई–कॉमर्सच्या माध्यमातून व्यवसायाची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. स्वयंरोजगाराच्या अनेक महत्त्वाच्या संधी युवकांना या माध्यमातून उपलब्ध होतील.

डिजिटल इंडिया हा महत्वाकांक्षी प्रकल्प देशहिताच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. त्याची यशस्वी अंमलबजावणी होणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे अनेक वर्षे जोपासलेले स्वप्न आहे. या प्रकल्पामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची प्रतिमा नक्कीच उज्ज्वल होईल, असा उदंड विश्वास प्रत्येक भारतीयाने मनात बाळगायलाच हवा.

डिजिटल इंडिया हे अल्पावधीत साकार होणारे स्वप्न नव्हे. आपण आत्ताच कुठे बीजे रोवली आहेत. ते एक प्रचंड आव्हानात्मक कार्य आहे. त्याचा विराट वृक्ष होण्यास व त्याची फळे चाखण्यास कदाचित संपूर्ण एक पिढीचा कालावधी द्यावा लागेल. सध्या आपण केवळ त्याची मशागत करूया व पुढील पिढ्यांना हा संपन्न वारसा प्रदान करण्यासाठी प्रयत्न करूया.

## विद्यार्थी व पालकांना महत्त्वाची सूचना

### ११ वी व पुढील शैक्षणिक प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे



**उत्पन्न दाखला**

१. तलाठी उत्पन्न दाखला
२. रेशन कार्ड
३. उत्पन्न पुरावा
४. कुटुंबप्रमुख फोटो

**डोमिसाईल दाखला**

१. तलाठी रहिवासी दाखला
२. शाळा सोडल्याचा दाखला किंवा बोनाफाईड
३. रेशन कार्ड
४. कुटुंबप्रमुख फोटो

**जातीचा दाखला**

१. विद्यार्थ्याचा शाळा सोडल्याचा दाखला
२. वडिलांचा शाळा सोडल्याचा दाखला
३. आजोबांचा शाळा सोडल्याचा दाखला
४. तलाठी जातीचा दाखला
५. तलाठी रहिवासी दाखला
६. रेशन कार्ड
७. कुटुंबप्रमुख फोटो
(एसी / एसटी–१९५०, व्हिजे / एनटी–१९६१, ओबीसी–१९६७ चे मानवी दिनांक पुरावे आवश्यक)

**नॉन क्रिमिलेअर दाखला**

१. तलाठी मागील ३ वर्षाचे उत्पन्न दाखले
२. तहसीलदार यांचा उत्पन्न दाखला
३. विद्यार्थ्याचा शाळा सोडल्याचा दाखला
४. वडिलांचा शाळा सोडल्याचा दाखला
५. जातीचा दाखला (प्रांत साहेब)
६. तलाठी जातीचा दाखला
७. तलाठी रहिवासी दाखला
८. रेशन कार्ड
९. कुटुंबप्रमुख फोटो–२

शैक्षणिक प्रवेशासाठी वरील दाखले मिळविण्यासाठी पालकांची जूनमध्ये धावपळ होते व कागदपत्रे वेळेत न मिळाल्याने विद्यार्थ्यांना शैक्षणिक नुकसान सोसावे लागते. हे टाळण्यासाठी आजच कागदपत्रे तयार करून घ्या.

## उन्हाळी सुट्टीत चौकटीच्या बाहेर जावून विचार करा

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांना दिलेले मोलाचे बोल**



- उन्हाळी सुट्टया सुरू झाल्या आहेत. नवीन कौशल्ये जाणून घेण्यासाठी आणि नवीन अनुभवांचा आनंद घेण्यासाठी त्यांचा वापर करा.
- असे काहीतरी करा जे तुम्हाला तुमच्या 'कम्फर्ट झोन'च्या बाहेर घेवून जाईल.
- नवीन स्थळांना भेटी द्या. सुट्टीत ट्रेनमधून प्रवास करा व लोकांशी संवाद साधा. त्यांच्या अनुभवांविषयी आणि त्यांच्या जीवनाबद्दल जाणून घ्या.
- तुमच्यापेक्षा कमी गुणवत्तेच्या कुटुंबातील मुलांशी खेळा आणि त्यांच्याशी नाते जोडा. मला खात्री आहे की, तुम्ही छान, नवी मित्र बनवाल.

## आमची उद्दिष्टे

* सर्व पात्र विद्यार्थ्यांना 21व्या शतकातील भारताच्या विकासात सहभागी होण्याची संधी प्राप्त करून देणे.
* विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये शिक्षणाचे महत्त्व आणि परिणामाबद्दल प्रबोधन करणे.
* सर्व पात्र विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक व उद्योजकीय ध्येय गाठण्यासाठी आर्थिक मदत करणे.
* विद्यार्थी, पालक व शिक्षकांना सक्षम बनविण्यासाठी नवनवीन उपक्रम विकसित करून ते अंमलात आणणे.
* सर्व उपक्रमांना स्वयंपूर्ण बनवणे, ज्यायोगे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळेल.

## लाभार्थ्यांचे एसडी-सीडबद्दलचे मत...



देवयानी चुडामण महाजन, रावेर — BE Computers (4th Year)

मागील सहा वर्षांपासून मला एसडी–सीडची शिष्यवृत्ती प्राप्त होत आहे. आज एका खेडेगावातील मुलगी इंजिनीअरिंगच्या शेवटच्या वर्षाला शिक्षण घेत आहे हे जेवढे विपरीत वाटते तेवढे सत्यही आहे आणि हे सत्य घडविण्यामागे ज्यांचे पाठबळ मला मिळाले ते म्हणजे एसडी–सीड. माझी कौटुंबिक परिस्थिती साधारण आहे. वडील शेतमजुरी करतात घरात कोणीही जास्त शिकलेले नाही, पण कोणीतरी मदतीला आहे या भावनेतून आजवरचा हा प्रवास अविरतपणे सुरू आहे. मा. दादांच्या या कार्यामुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे भवितव्य घडत आहे. नक्कीच पुढील काळात एसडी–सीड विद्यार्थ्यांच्या विकासाची एक अभिनव चळवळ म्हणून देशात नावारूपाला येईल अशी आशा मी व्यक्त करते.



मयुर गणेश पाटील, जळगाव — BE Mechanical (Passed with 1st Class in 2016)

मा. सुरेशदादा जैन यांच्या एसडी–सीड उपक्रमाचा मी मनापासून आभारी आहे. या संस्थेच्या माध्यमातून माझ्यासारख्या गरजवंत विद्यार्थ्यांना एवढी मोठी शैक्षणिक उंच गरूडभरारी घेण्याचे बळ मिळत आहे व त्यामुळेच आज मी भारती विद्यापीठ, पुणे येथून बी.ई. मेकॅनिकल चतुर्थ वर्षाचा अभ्यासक्रम प्रथम क्रमांकाने पूर्ण करू शकलो. माझे वडील एका लहान हॉटेलमध्ये वेटरचे काम करतात. त्यांना मिळाणारा तुटपुंजा पगार हा पुण्यासारख्या शहरामध्ये माझे इंजिनिअरिंगचे शिक्षण घेण्यासाठी पुरेसा नव्हता, पण एसडी–सीड शिष्यवृत्तीच्या सहकार्याने मी माझे शिक्षण पूर्ण करू शकलो. मी सर्व विद्यार्थ्यांना एकच सांगेन की, आर्थिक परिस्थितीमुळे चांगले शिक्षण घेता येत नाही हा समज आपल्या मनातून काढून टाका आणि आपल्या पाठीवर एसडी–सीडचा मायेचा हात आहे याची जाणीव ठेवून निर्विघ्नपणे आणि आनंदाने आपले शिक्षण पूर्ण करा.



लिपिका सुनील नेमाडे, जळगाव — BE E&TC (4th Year)

मी दहावी पास झाल्यावर वृत्तपत्रामध्ये एसडी–सीड संदर्भात माहिती वाचली आणि शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला. दीड महिन्यानंतर मला पत्र आले की, मी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहे. वाचून फार आनंद झाला. डिप्लोमाचे शिक्षण पूर्ण झाल्यावर वडिलांनी पैशाअभावी माझे शिक्षण थांबविण्याचे ठरविले होते. तेव्हा मी त्यांना सांगितले की, एसडी–सीड आपल्या पाठीशी आहे काही काळजी करू नका आणि त्यांनी मला पुढील शिक्षणासाठी अनुमती दिली. तेव्हापासून आज मी इंजिनीअरिंगच्या शेवटच्या वर्षाला शिक्षण घेत आहे तोपर्यंत दरवर्षी ही शिष्यवृत्ती मिळत आहे. मा. दादांचे आशीर्वादामुळे खऱ्या अर्थाने मी इथपर्यंत पोहचू शकले. त्यासाठी मी मनापासून एसडी–सीड परिवाराचे आभार मानते. मी सुद्धा जेव्हा माझ्या पायावर उभी राहील तेव्हा एसडी–सीडमध्ये माझे योगदान देईन असे वचन देते. जेणेकरून माझ्यासारख्या मुलांना जास्तीत जास्त मदत मिळेल.



अझर भैय्या पटेल, बोदवड — BE Mechanical (3rd Year)

सर्वप्रथम मी एसडी–सीडचे आभार व्यक्त करतो. मा. दादांनी एसडी–सीडचे जे वटवृक्ष लावले आहे त्या वटवृक्षाची गोड फळे आज आम्हा विद्यार्थ्यांना चाखायला मिळत आहेत. मला मिळणाऱ्या शिष्यवृत्तीच्या सहाय्याने मी माझ्या यशाचे शिखर चढत आहे व त्यामुळे मला एक नवीन एक नवीन प्रेरणा मला मिळत आहे. आपल्या जिल्ह्यातील मी व माझ्यासारख्या हजारो गरजवंत आणि गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षण घेतांना आता आर्थिक भीती न वाटता एक अनोखं बळ मिळालं आहे. एसडी–सीडचे हे कार्य असेच अविरतपणे सुरू राहण्यासाठी मी सुद्धा माझे शिक्षण पूर्ण झाल्यावर या संस्थेला सर्वतोपरी सहकार्य करणार आहे.

SD SEED
Suresh Dada Scheme for Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना

**HEAD OFFICE:**
7, Shivaji Nagar, Jalgaon - 425 001, Maharashtra, India.
Tel: (0257) 2235254 I Fax: (0257) 2234258 I Website: www.sdseed.in